झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, से.बापट रोड,पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/ तां. ५/ झोपुआ/ प्र.क्र./११ /१३६०
दि: १३/७/११

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो. पु. यो - २००४/ प्र .क्र. -२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे सक्षम प्राधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी गलिच्छ वस्ती/ झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकासक मे. टारगेट फायनान्स प्रा.लि.यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. टारगेट फायनान्स प्रा.लि. चे डायरेक्टर श्री. विवेक व्ही. पाटील यांनी नोंदणी कृत खरेदीखताने मालकी हक्क प्राप्त केले आहेत. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदर ठिकाणी एकुण ९२ झोपडया अूसन त्यापैकी ७२ निवासी व १ बिगरनिवासी असे एकुण ७३ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. पैकी ६३


F:\TAN-5\Karylayin Tipani\Tipani.doc

पात्र झोपडीधारकांनी ( ८३% ) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, महाराष्ट्र ( सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये ,सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल. आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| **जमिनीचा तपशील** | **क्षेत्र ( चौ. मी.)** | **चतुःसिमा** |
|---|---|---|
| घोरपडे पेठ, नगररचना क्र.३,<br>फा. प्लॉ.क्र. १६१<br>(सि.स.नं.३६२ व ३६३ पैकी स.नं. ५३९अ/१६ ब) | १५७१.१७ चौ. मी. | पुर्व-फा. प्लॉ.क्र. १६२<br>दक्षिण-फा. प्लॉ.क्र. १६३.<br>पश्चिम- सि.स.नं.३३६,३३५ अ<br>उत्तर- रस्ता |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

"सत्यप्रत"

सहाय्यक अभियंता क्र.
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
पुणे-१६.

(महेश पाठक)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,